दिनांक ०४/०३/२०२१

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक संजय मुरलीधर वाघमारे, पद- मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा अन्वी, ता.सिल्लोड जि.औरंगाबाद यांनी ३५००/- रु लाचेची स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद च्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव, हुद्दा | :- | संजय मुरलीधर वाघमारे, वय ४६ वर्ष पद- मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा अन्वी, ता.सिल्लोड जि.औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिल्लोड ग्रामीण, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती रेशमा सौदागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ३,५००/- रु स्विकृती |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे मुलाचे शाळा शिकत असल्याचे प्रमाणपत्र (बोनाफाईड) घेण्यासाठी व नाव दुरुस्त करण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | अन्वी, ता.सिल्लोड, औरंगाबाद येथील जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक यांच्या कक्षात. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचा मुलगा शिकत असलेल्या जिल्हा परिषद अन्वी ता. सिल्लोड जि. औरंगाबाद येथील शाळेतुन मुलाचे शाळा शिकत असल्याचे प्रमाणपत्र (बोनाफाईड) घेण्यासाठी व त्या प्रमाणपत्रामध्ये नाव दुरुस्ती करुन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे संजय वाघमारे, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा अन्वी ता. सिल्लोड जि. औरंगाबाद हे ४,०००/- रु लाचेची मागणी करित असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, संजय मुरलीधर वाघमारे, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा अन्वी ता. सिल्लोड जि. औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे ४,०००/- रु लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ३,५०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, संजय मुरलीधर वाघमारे, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा अन्वी ता. सिल्लोड जि. औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन ३,५००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे सिल्लोड ग्रामीण, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक श्री. मारोती पंडीत, पोलीस उपअधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार रवींद्र अंबेकर, अरुण उगले , भुषण देसाई, चालक अंमलदार बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

०४/०३/२०२१

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.